# गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

(महाराष्ट्र शासन अधिसूचना क्रमांक २००७/(३२२/०७) विशि –४ महाराष्ट्र अधिनियम १९९४ (१९९४ चा महा.३५) च्या कलम ३ च्या पोटकलम (२) अन्वये दिनांक २७ सप्टेंबर, २०११ रोजी स्थापित व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ (सन २०१७ चा महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम क्रमांक ६) (द्वारा संचालीत राज्य विद्यापीठ)

**( परीक्षा व मुल्यमापण मंडळ)**

एम.आय.डी.सी.रोड, कॉम्प्लेक्स, गडचिरोली–४४२६०५

फोन नंबर ०७१३२–२२३१०४ ईमेल: director.boee@unigug.ac.in

जा.क्र./गों.वि./परीक्षा विभाग/२४६५/२०२३ दि. २१/०९/२०२३

## परिपत्रक

**विषय:– 'कॅरी फारवर्ड' च्या पध्दतीनुसार शैक्षणिक सत्र २०२३–२४ करिता विद्यार्थ्यांना प्रवेश देण्याबाबत.**

**संदर्भ** – १. मा. विद्या परीषद तातडीची सभा दि. २१ सप्टेंबर, २०२३.

गोंडवाना विद्यापीठाशी संलग्नीत महाविद्यालयातील सर्व प्राचार्य तथा संबधित सर्व विद्यार्थ्यांना कळविण्यात येते की, उपरोक्त संदर्भ क्र. १ नुसार 'कॅरी फारवर्ड' च्या संदर्भात विद्यार्थी संघटनेकडून निवेदन प्राप्त होत असल्याने शैक्षणिक सत्र २०२३–२४ मध्ये विद्यार्थ्यांना प्रवेश देतांना खालीलप्रमाणे अटी व शर्तीच्या अधीन राहून कार्यवाही घ्यावी.

१. प्रथम सत्रात अनुत्तीर्ण विद्यार्थ्याला दुसऱ्या वर्षामधील तिसरे सत्र, पाचवे सत्र, सातवे सत्र व नववे सत्रात पुर्ण शुल्क आकारून प्रवेश देवून फक्त तो हिवाळी–२०२३ च्या सत्रामध्ये अनुत्तीर्ण असलेल्या विषयाच्या परीक्षा देईल. मात्र वरील सत्राच्या विद्यापीठ व महाविद्यालयाची कोणत्याही विषयाच्या परीक्षेस बसण्याची त्याला मनाई असेल.

२. संबंधित विद्यार्थ्याकडून वरील सत्राच्या परीक्षेचे संपुर्ण प्रवेशाची प्रवेश फि व परीक्षेचे परीक्षा शुल्क पुर्णपणे आकारण्यात येईल मात्र संबधित विद्यार्थी सदर सत्राच्या परीक्षा उन्हाळी–२०२४ मध्ये देईल.

३. सदर विद्यार्थ्यांस संबधित शैक्षणिक वर्षाचे संपुर्ण शुल्क भरावे लागेल. जर हिवाळी परीक्षेत अनुत्तीर्ण झाल्यास त्याने संपुर्ण भरलेले शुल्क परत मिळणार नाही, व त्याने घेतलेला प्रवेश आपोआप रद्द समजण्यात येईल.

४. विद्यार्थी हिवाळी परीक्षेत पास झाल्यास सदर विद्यार्थी हा त्या शैक्षणिक सत्रातील नियमित सत्रात प्रवेश घेण्यास पात्र झाला असे समजून त्याला दोन्ही सत्राचे पेपर उन्हाळी परीक्षेमध्ये द्यावे लागतील. सत्राची पुर्ण शिक्षण शुल्क भरणे आवश्यक राहील.

५. मात्र ही सवलत फक्त सत्र २०२३–२४ करीताच लागु राहील याची संबंधितांनी नोंद घ्यावी.

21/9/023

(दिनेश ज. नरोटे)
संचालक (प्रभारी)
परीक्षा व मुल्यमापन मंडळ

प्रतीलिपी

१. मा. कुलगुरू, यांचे स्विय सहायक, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली यांना माहितीस्तव सविनय सादर.
२. मा. प्र–कुलगुरू, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली यांना माहितीस्तव सविनय सादर.
३. मा. कुलसचिव, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली यांना माहितीस्तव सविनय सादर.
४. मा. वित्त व लेखा अधिकरी, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली यांना माहितीस्तव सविनय सादर.
५. समन्वयक, एमकेसीएल., गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली याना पुढिल कार्यवाहीस अग्रेषीत.